


**अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय वविशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

बी-२०१/२०२ अर्जुन सेंटर, स्टेशन रोड, गोवंडी (प) मुबई- ४०० ०८८

रजि नं :४३७६०३ EMAIL ID: esta.arti@gmail.com website: https://arti.org.in फोन नं: ०२२- २५५००१९४/२५५००१९५/४४५१५८५४


जा.क्र/आर्टी/मुंबई/योजना/संस्था/२०२५-२६/००५२ दिनांक – ०५/०२/२०२६

## नामनिर्देशित संस्थांना काही महत्त्वाच्या सूचना

❖ **सामंजस्य करारानामा बाबत:**

१. सामंजस्य करारानामा दि. ०९/०२/२०२६ व दि. १०/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायं ५.०० या कालावधी मध्ये आर्टी मुख्य कार्यालयात करण्यात येणार आहे. सामंजस्य करारानामाचे प्रारुप (Draft) हे प्रत्येक संस्थेला त्यांच्या ईमेलवर डॉक्युमेंट फाईल द्वारे पाठवण्यात येत आहे.

२. सदर ड्राफ्ट मध्ये संस्थांनी रिकाम्या जागी आपल्या संस्थेचे नाव व प्रशिक्षण केंद्राचे ठिकाण नमुद करणे गरजेचे आहे. सदर नाव हे टीआरटीआय संस्थेद्वारा नामनिर्देशित केले आहे त्या पद्धतीने असणे आवश्यक आहे. सामंजस्य करारानामाच्या मुळ प्रारूपात तसेच नावात कोणत्याही स्वरुपाचा बदल करू नये.

३. सामंजस्य कराराननामा रुपये ५००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रिंट करून वकिलांद्वारे नोटरी केलेला असावा. सदर सामंजस्य करारानामाच्या ०२ मुळ प्रती सोबत आणणे आवश्यक आहे.

४. सामंजस्य करारानामाच्या खालील रिकाम्या जागेमध्ये डावीकडे आपल्या संस्थेचा शिक्का व सही असावी. उजवीकडे मा. व्यवस्थापकीय संचालक, आर्टी यांच्या सही व शिक्का यासाठी जागा रिकामी ठेवावी.

५. सामंजस्य करारानामा सोबतच संस्था संचालकांनी खालील प्रमाणपत्रे सोबत आणावीत.

   a. GST Certificate

   b. Institute Registration Certificate

६. दि. ०९/०२/२०२६ रोजी ज्या संस्थांना उमेदवारांनी पसंतीक्रमांक दिलेले आहेत अशाच संस्था आर्टी संस्थेद्वारा नामनिर्देशित पत्र देण्यात येईल. ज्या संस्थांना एकाही उमेदवरांनी पसंती दिलेली नाही. अशा संस्थांसोबत आर्टी संस्थेद्वारा सामंजस्य करारानामा करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

७. सामंजस्य करारानामा करतेवेळी संस्था संचालकांनी स्वत: उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

❖ **उमेदवारांची यादी कळविणेबाबत:**

१. सामंजस्य करारानामा झाल्यानंतर संस्थांना उमेदवारांची यादी व कार्यारंभ आदेश ईमेल वर कळविण्यात येईल.

२. प्रशिक्षण सुरू करण्याच्या अनुषंगाने संस्थांनी पुढील कार्यवाहीसाठी उमेदवारांशी पुढील संपर्क करावा.

❖ **उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीबाबत:**

१. उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी ही पूर्णत: संस्था द्वारे करण्यात येणार आहे. संस्थांनी उमेदवारांशी संपर्क करून कागदपत्रे पडताळणी ही लवकरात लवकर पूर्ण करावी.

२. उमेदवारांचे मुळ कागदपत्रे व छायांकित प्रती व्यवस्थित पडताळणी करावी तसेच नमुद कागदपत्रांची प्रत आर्टी संस्थेस विद्यावेतनाकरिता सादर करावी. त्यानंतर प्रत्यक्ष प्रशिक्षणे सुरू करण्यात येईल.

३. खालील नमुद कागदपत्रे उमेदवारांनी २ छायांकित प्रती मध्ये पडताळणीसाठी सोबत आणणे आवश्यक आहे. खाली नमुद केलेले सर्व प्रमाणपत्रे उपलब्ध करून देणे उमेदवारांस बंधनकारक आहे.

   a. Caste Certificate जातीचा दाखला
   b. Caste Validity Certificate (if Available) जात वैधता प्रमाणपत्र
   c. Domicile Certificate रहिवास दाखला
   d. Income Certificate उत्पन्न दाखला (Year – २०२५ -२६)
   e. Aadhar Card आधार कार्ड
   f. Bank Passbook बँक पासबुक
   g. CET – Score Card
   h. Training Institute Preference Acknowledgment Receipt.
   i. २ Passport Size Photocopy
   j. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र
   k. दुबार योजनेचा लाभ न घेतलेले प्रतिज्ञापत्र (नमुना खाली जोडलेला आहे)

४. शैक्षणिक अर्हता योजनांच्या पातळीनुसार आहे. त्याची यादी खालीलप्रमाणे आहे. त्यानुसार उमेदवारांकडून शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र पडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच परिक्षेच्या वेळी दिलेल्या शैक्षणिक अर्हता संस्थांनी पडताळणी करून पहाव्यात व त्यानुसार कार्यवाही करावी.

| अ.क्र | योजनेचे नाव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १. | मिलीटरी भरती प्रशिक्षण | १० वी पास |
| २. | पोलीस भरती प्रशिक्षण | १२ वी पास |
| ३. | आयबीपीएस, बँक.व इतर स्पर्धा प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |
| ४. | कर्मचारी निवड आयोग – वर्ग ३ परिक्षा प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |
| ५. | एम.पी.एस.सी.- अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |
| ६. | एम.पी.एस.सी.- राज्यसेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |
| ७. | एम.पी.एस.सी.- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा (MES) परीक्षा पूर्व प्रशिक्षण | संबंधित क्षेत्रातील पदवी उत्तीर्ण |
| ८. | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्याय दंडाधिकारी प्रथम वर्ग (JMFC) प्रशिक्षण | संबंधित क्षेत्रातील पदवी उत्तीर्ण |
| ९. | यु.पी.एस.सी.- नागरी सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण | पदवी उत्तीर्ण |

५. सर्व मुळ प्रमाणपत्रे तपासून संस्थांनी उमेदवारांकडून त्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती २ प्रतीत जमा करून घेणे गरजेचे आहे. सदर जमा करून घेतलेले सर्व कागदपत्रे आर्टी, मुंबई कार्यालयास पडताळणी पूर्ण झाल्यानंतर कागदपत्रांची १ प्रत कार्यालयास पाठवून द्यावीत.

स्वाक्षरी/-
व्यवस्थापकीय संचालक
अण्णा भाऊ साठे संशोधन व
प्रशिक्षण संस्था (आर्टी), मुंबई

# प्रतिज्ञापत्र

मी ------------------------------------------------------------रा. -----------------------------.

माझी आर्टी मार्फत ----------------------------------------------------चे प्रशिक्षणाकरीता ----------येथे

निवड झालेली असून मी ---------------------------------------------------या संस्थेत प्रशिक्षण घेण्यास

इच्छुक आहे. तरी मी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्यामार्फत सदर

योजनेचा लाभ घेतलेला आहे/नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या द्वारे लाभ घेतला असल्याचे

आढळून आल्यास मी नियमानुसार कार्यवाहीस पात्र राहील करीता प्रतिज्ञापत्र लिहून देत आहे.

नाव---------------------------------

स्वाक्षरी------------------------------

ठिकाणः

दिनांकः